जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 DEC 2017
लोकमत



## शिवाजी विद्यापीठ

# सुवर्णमहोत्सवी निधीतून चार कोटी

शासनदरबारी प्रलंबित असलेल्या सुवर्णमहोत्सवी निधीपैकी आतापर्यंत शिवाजी विद्यापीठाला चार कोटी ११ लाख ९९ हजार रुपये मिळाले आहेत. अजून सुमारे ४० कोटी रुपये राज्य शासनाकडे प्रलंबित आहेत. पूर्णपणे हा निधी मिळविण्यासाठी गेल्या सहा वर्षांपासून विद्यापीठ प्रशासनाचा सातत्याने पाठपुरावा सुरु आहे.

संशोधनासह शैक्षणिक गुणवत्तेचा केंद्रबिंदू दक्षिण महाराष्ट्राकडे आणणाऱ्या शिवाजी विद्यापीठाला सन २०११ मध्ये सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त तत्कालीन काँग्रेस-राष्ट्रवादी सरकारने ४५ कोटी रुपयांचा निधी जाहीर केला. निधी मिळेल या अपेक्षेने विद्यापीठाने स्वनिधीतून स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट, आदी उपक्रम सुरु केले. मात्र, प्रस्तावानुसार निधी मिळाला नसल्याने विद्यापीठाचे नावीन्यपूर्ण उपक्रम रखडले आहेत.

भाजप-सेना सरकारकडून पूर्वीच्या मंजूर एकूण निधीपैकी सन २०१४-१५ साठी शासनाकडून विद्यापीठाला १३ कोटी ६९ लाख ६१ हजार रुपयांचा निधी मिळणार होता. मात्र, तो या वर्षामध्ये मिळाला नाही. सुवर्णमहोत्सवी निधी लवकरात लवकर मिळविण्यासाठी विद्यापीठाकडून सातत्याने पाठपुरावा सुरु आहे. त्याला शासनाकडून काही प्रमाणात सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. ऑगस्टअखेरीस विद्यापीठाला ३२ लाख रुपयांचा निधी मिळाला. त्यामुळे एकूण सुवर्णमहोत्सवी निधीपैकी चार कोटी ११ लाख ९९ हजार रुपये विद्यापीठाला आतापर्यंत प्राप्त झाले आहेत. विद्यापीठाने आणखी १३ कोटी रुपयांची मागणी करणारा प्रस्ताव शासनाला गेल्या महिन्यात सादर केला आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 DEC 2017
पुण्यनगरी



तलवारबाजी स्पर्धेच्या उद्‌घाटनप्रसंगी नागेश चौगुले, ॲड. दिग्विजय कुराडे यांच्यासह अन्य.

# शिवराजमध्ये आंतरविद्यापीठ तलवारबाजी स्पर्धेस प्रारंभ

**गडहिंग्लज / प्रतिनिधी :** येथील शिवराज महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ आंतरविद्यापीठ तलवारबाजी स्पर्धेचे उद्‌घाटन मनसेचे जिल्हाध्यक्ष नागेश चौगुले यांच्या हस्ते करण्यात आले.

संचालक ॲड. दिग्विजय कुराडे व प्राचार्य डॉ. एस. वाय. कोतमिरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी चौगुले म्हणाले, तलवारबाजी हा खेळ धाडसी व शौर्याचा खेळ आहे. या खेळातून अनेक खेळाडू घडले पाहिजे. मुलींना हा खेळ स्वःरक्षणाच्या दृष्टीने गरजेचा खेळ आहे. या धाडसी खेळातून अनेक खेळाडू घडावेत व देशाचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन चौगुले यांनी केले. प्राचार्य डॉ. एस. वाय. कोतमिरे यांनी मनोगत व्यक्त केले. सातारा जिल्हा तलवारबाजी असोसिएशनचे सचिव सुधीर जमदाडे यांनी तलवारबाजी खेळाबाबत मार्गदर्शन केले. या स्पर्धेतून तलवारबाजीसाठी थेट ऑल इंडियासाठी शिवाजी विद्यापीठाचा संघ निवडला जातो. तीन प्रकारातून प्रत्येकी चार असे १२ मुलींचा व १२ मुलांचा संघ निवडला जात असल्याची माहिती कोल्हापूर जिल्हा तलवारबाजी असोसिएशनचे अध्यक्ष विनय जाधव यांनी दिली. यावेळी आझाद पटेल, राहुल मगदूम, रतन नाईकनवरे, प्रफुल्ल धुमाळ, संदीप जाधव, सुरज पोवार, राहुल सरडे, शुभम जाधव, नितीन मोरे यांच्यासह सातारा, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तलवारबाजी स्पर्धेचे खेळाडू, शिक्षक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 DEC 2017
तरुण भारत

# 'बेटी बचाओ अभियान' अंतर्गत विद्यापीठात शुक्रवारी कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयातील बेटी बचाओ अभियानाच्या समन्वयासाठी विद्यापीठातील 'बेटी बचाओ अभियान'अंतर्गत एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे. या कार्यशाळेचे उद्घाटन शुक्रवार (२२) रोजी सकाळी १० वाजता मानव्यशास्त्र सभागृहात होणार आहे. त्यामुळे या कार्यशाळेला जास्तीत जास्त महाविद्यालयीन समन्वयकांनी उपस्थित राहण्याचे, आवाहन बेटी बचाओ अभियानाच्या समन्वयक डॉ. पी. बी. देसाई यांनी केले आहे.

21 DEC 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अशोकराव माने संकुलाच्या विद्यार्थिनीचे यश

**पेठ वडगाव / प्रतिनिधी :** येथील अशोकराव माने शैक्षणिक संकुलातील इलेक्ट्रॉनिक्स आणि टॅली कम्युनिकेशन्स विभागाची विद्यार्थिनी भगवती शिवाजी सूर्यवंशी हिने मे २०१७ मध्ये शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षेत अभियांत्रिकी व तंत्रज्ञान पदव्युत्तर विभागामध्ये सर्व शाखांमध्ये सर्वाधिक गुण मिळवून सर्वप्रथम आल्यांची माहिती कार्यकारी संचालक डॉ. दीपक मुदगल यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठातील परीक्षा विभागाच्या उप-कुलसचिवांनी भगवती सूर्यवंशी हिचे अभिनंदन केले आहे.

या यशाबद्दल विद्यापीठातर्फे पुण्याच्या महाराष्ट्र टेक्निकल एज्युकेशन सोसायटीचा धोंडीमामा साठे पुरस्कार, रोख रक्कम व सन्मानपत्र देऊन भगवती सूर्यवंशी हिला गौरविण्यात येणार आहे. अशोकराव माने शैक्षणिक संकुलाच्या अभियांत्रिकी पदवीच्या पहिल्या बॅचमधूनच २०१३ साली संगणक विभागाची वेदरूचा पकाले, तर मेकॅनिकल विभागाचा विनायक भटाले यांनी शिवाजी विद्यापीठामध्ये सर्वप्रथम येण्याचा बहुमान पटकाविला. प्रत्येक वर्षामध्ये संस्थेचे विद्यार्थी विद्यापीठाच्या यादीमध्ये सर्वोच्च येण्याची शृंखला आजतागायत अखंडित राहिली आहे. आयएसओ सर्टिफाईड संस्थेच्या उत्कृष्ट शैक्षणिक दर्जामुळेच संकुलाला नॅकचे 'अ' मानांकन प्राप्त झाले आहे. संकुलातील इलेक्ट्रॉनिक्स आणि टॅली कम्युनिकेशन्स विभागाच्या अद्ययावत सुसज्ज प्रयोगशाळा, अनुभवी तज्ज्ञ प्राध्यापक वृंद तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता राबविण्यात येणारे विविध शैक्षणिक उपक्रम याच्या बळावरच हे यश मिळाले असल्याची माहिती सूर्यवंशी हिचे मार्गदर्शक डॉ. संजय पाटील, विभागप्रमुख प्रा. प्रवीण घेवारी पदव्युत्तर समन्वयक प्रा. प्रवीण देसाई यांनी दिली.



**पेठ वडगाव : भगवती सूर्यवंशीचा सत्कार करताना डॉ. दीपक मुदगल, डॉ.संजय पाटील, प्रा. अमोल राजमाने, प्रा. प्रवीण घेवारी, प्रा. सुहास सपाटे, प्रा. युवराज गुरव.**

अशोकराव माने शैक्षणिक संकुलामधील उपलब्ध अद्ययावत शैक्षणिक पायाभूत सुविधा, अनुभवी व कुशल प्राध्यापक वृंद, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता देण्यात येणाऱ्या विविध प्रशिक्षणामुळे दिवसेंदिवस संस्थेचा सर्वांगीण विकास होत आहे, अशी माहिती डॉ. दीपक मुदगल यांनी सूर्यवंशी हिच्या सत्कारप्रसंगी दिली. विद्यार्थ्यांचे यश हेच संस्थेचे यश असल्याने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अधिकाधिक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची संस्थेची परंपरा यापुढेही अधिक समृद्ध होईल, अशी ग्वाही अध्यक्ष विजयसिंह माने यांनी दिली.

उपप्राचार्य डॉ. इमाया स्वामी, डीन डॉ. व्ही. ए. कुलकर्णी, संशोधन व विकास अधिष्ठाता डॉ. दूरदंडी बाडकर, प्रा. सुहास सपाटे इलेक्ट्रॉनिक्स आणि टेली कम्युनिकेशन्स विभागाचे प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

21 DEC 2017 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांनी अनुभवला अवकाशातील उल्का वर्षाव


## अवकाशात दिवाळीच साजरी होत असल्याचा भास : राजाराम महाविद्यालयाच्या ५० विद्यार्थ्यांचा सहभाग

प्रतिनिधी
पन्हाळा

आकाशातील सिंह राशीमधून होणारा उल्कावर्षाव पाहण्याचा दुर्मिळ योग ज्येष्ठ खगोलशास्त्र अभ्यासक व संशोधक डॉ. आर.व्ही. भोसले व अविराज जत्राटकर यांनी १२ इंची टेलिस्कोपद्वारे विद्यार्थ्यांना दाखवून मार्गदर्शन केले.

आकाशात सिंह राशीतून उल्कावर्षाव होतांना पाहायला मिळत असताना रात्री १२ च्या सुमारास पूर्वक्षितिजावर सिंह रास दिसू लागली. तेंव्हापासून पहाटे ४ पर्यंत हा वर्षाव सुरु होता. यावेळी तासाला १५ ते २० उल्का कोसळताना दिसल्या.

आपली पृथ्वी टेम्पल टटल या धूमकेतूचा मार्ग (कक्षा) ओलांडून जाणार असल्याने हा उल्कावर्षाव घडतो. हा धूमकेतू दर ३३ वर्षांनी सूर्यमालेत येऊन सूर्याला फेरी मारून जात असतो. त्यावेळी धुमकेतूमधील काही द्रव त्याच्या मार्गावर सांडत असते. त्याला अंतराळातील डेबरीज (कचरा) असे म्हणतात.



पन्हाळा : नरके पन्हाळा पब्लिक स्कूलच्या क्रीडांगणावर दुर्बिणीतून उल्कावर्षाव पाहताना विद्यार्थी.

जेंव्हा पृथ्वी या भागातून पुढे जात असते तेंव्हा गुरुत्वाकर्षणामुळे हा कचरा पृथ्वीकडे खेचला जातो आणि वातावरणाशी घर्षण होऊन तो पेट घेतो. तेंव्हा आकाशात एक लखलखीत प्रकाश शलाका चमकून जाते. काहीवेळेला तर मोठाले अग्निगोलसुद्धा दिसतात. त्यामुळे पृथ्वीवासीयांना नभांगणात नयनरम्य रोषणाई पाहायला मिळते. जणू आकाशाच्या अंगणात नक्षत्रांची दिवाळीच चालू आहे असे वाटते.धूमकेतूचा हा कचरा अंतराळात सिंहराशीच्या दिशेत असल्याने या उल्का सिंह राशीतून पडत आहेत असे भासते. म्हणूनच या खगोलीय अविष्कारास लिओनीड्स– म्हणजे सिंह राशीतील उल्कावर्षाव असे म्हणतात. इतर राशीमधूनही वर्षभरात लहान–मोठे वर्षाव होतच असतात.

त्यातील काही प्रेक्षणीय असतात. उदा. जेमिनिड, परसुअस त्याप्रमाणेच लिओनीड्स हा एक आहे. उल्कावर्षाव अनुभवणे ही तर खगोल प्रेमींसाठी जणू नैसर्गिक दिवाळीची पर्वणीच होती यावेळी ज्येष्ठ खगोलशास्त्र अभ्यासक डॉ.. भोसले यांनी विध्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगीतले की, उल्कावर्षाव होत असताना या उल्का जमिनीवर येत नाहीत तर उल्कांचा पुनर्जन्म होतो तर अविराज जत्राटकर यांनी दुर्बिणीचा उपयोग आणि उल्कावर्षावाची माहिती दिली. राजाराम महाविधालयाचे सुमारे ५० विद्यार्थी या कार्यक्रमात सहभागी झाले होते. ही दुर्बीण नरके पब्लिक स्कूलच्या खेळाच्या मैदानावर लावण्यात आली होती.